# कर्मवीर भाऊराव पाटील यांची बहुजन शैक्षणिक चळवळ

**डॉ.शिवाजी सुबराव पाटील**

सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा

**सारांश :**

शूद्रातिशूद्र समाजाला तसेच स्त्रियांना चांगल्या प्रकारचे जीवनमान मिळवून द्यावयाचे असेल तसेच त्यांना माणूस म्हणून त्यांचे स्थान निर्माण करावयाचे असेल तर या बहुजन समाजाला शिक्षण दिले पाहिजे अशी कर्मवीरांची खात्री झाली होती.या विचाराला अनुसरूनच काले येथे भरलेल्या 4 ऑक्टोबर,1919 च्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापना घोषणा केली व १९२४ मध्येसंस्थेचे स्थलांतर सातारा येथे केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रभावामुळे त्यांनी आपल्या संस्थेला 'रयत' शिक्षण संस्था असे नाव दिले.सत्यशोधक चळवळीमधील महत्वाचे तत्व म्हणजे अस्पृश्यतानिवारण करणे होय. या तत्त्वानुसार कर्मवीरांनी सुद्धा अस्पृश्यता निवारण होण्याच्या दृष्टिकोनातून सर्वजाती व सर्वधर्मियांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. अण्णांनी श्रमप्रतिष्ठा आणि स्वावलंबन यांना केवळ शिक्षणाच्या नव्हे तर जीवनाचा पायाभूत आधार मानले आहे. रयत शिक्षण संस्थेचे 'स्वावलंबी शिक्षण' हे ब्रीद वाक्य आहे. कर्मवीरांच्या शिक्षण संस्थेमुळे खेड्या पाड्यामध्ये शिकलेल्यांची पिढी निर्माण झाली व त्यातून बहुजन समाजामध्ये नेतृत्वाची निर्मिती झाली. ग्रामीण भागात मुलांच्याबरोबर मुलीनीसुद्धा शाळेत प्रवेश घेतला पाहिजे यावर भर दिला. कर्मवीर अण्णांनी शिक्षण व्यवस्थेचे निर्ब्राह्मणीकरण केले. ब्राह्मण वर्गाच्या हातामध्ये असणारी शिक्षण व्यवस्था बहुजन समाजाच्या हातामध्ये आणली. ग्रामीण भागातील बहुजनांच्या शिक्षणासाठी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि स्वाध्याय या चतुसुत्री वर आधारित कर्मवीरांनी व्यापक अशी शैक्षणिक चळवळ उभी केली आणि परिघावरील माणूस समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले आहे. आज शतक पूर्ण केलेली रयत शिक्षण संस्था पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण आणि आधुनिक संशोधनामध्ये अत्यंत यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय विचार परंपरेमधील अत्यंत महत्त्वाचे स्थान असणारे तथागत गौतम बुद्ध म्हणतात की, मानवी जीवनामध्ये प्रत्येक घटनेला एक कारण असते. मानवी जीवनात दुःख आहे आणि या दुःखाला ही कारण आहे. या दुःखाचे मूळ कारण म्हणजे अज्ञान किंवा अविद्या होय या अज्ञानामधून तृष्णा म्हणजेच जगण्याची धडपड सुरू होते व त्यातून दुःखाची निर्मिती होते. गौतम बुद्धांनी द्वादशीनिदानाचा सिद्धांत सांगितला आहे. द्वादश म्हणजे बारा आणि निदान म्हणजे दुवे होय. या द्वादशनिदानाचा प्रारंभ बिंदू हा अविद्या किंवा अज्ञान आहे तर अंतिम बिंदू जरामरण आहे जरामरण म्हणजे वृद्धावस्था येऊन मृत्यू होणे होय. थोडक्यात बुद्धाने सांगितलेले दुःखाचे मूळ कारण अविद्या आहे. हेच सूत्र पुढे महात्मा फुले यांनी अंगिकारले व त्यांनी विद्येला म्हणजेच शिक्षणाला जास्त महत्त्व दिले.शिक्षण नसल्यामुळे शूद्रातिशूद्र यांच्यावर अनर्थ ओढविला असे ते म्हणतात. महात्मा फुले यांनी "विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले" अशा प्रकारचे वर्णन केलेले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज,महाराजा सयाजीराव गायकवाड, गाडगे महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या सर्वांचा प्रभाव होता.

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना :**

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाज व त्या मार्फत चालवल्या जाणाऱ्या सत्यशोधकी चळवळीमध्ये कर्मवीर सक्रिय सहभागी होते. शूद्रातिशूद्र समाजाला तसेच स्त्रियांना चांगल्या प्रकारचे जीवनमान मिळवून द्यावयाचे असेल तसेच त्यांना माणूस म्हणून त्यांचे स्थान निर्माण करावयाचे असेल तर विठ्ठल रामजी शिंदे यांनी या समाजाला बहुजन समाज असे म्हटले अशा या बहुजन समाजाला शिक्षण दिले पाहिजे व शिक्षण देणे हाच एकमेव उपाय आहे अशी कर्मवीरांची खात्री झाली होती.या विचाराला अनुसरूनच काले येथे भरलेल्या 4 ऑक्टोबर 1919 च्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापना घोषणा केली व 1924 मध्ये संस्थेचे स्थलांतर सातारा येथे केले. या संस्थेचे नाव काय द्यायचे असा ज्यावेळेस त्यानी विचार केला त्यावेळेस त्यांच्यावर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रभावामुळे त्यांनी आपल्या संस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव दिले. कारण छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते याचा अर्थ ते बहुजनांचे राजे होते म्हणून आपली संस्था सुद्धा बहुजनांना शिक्षण देणारी असल्यामुळे आण्णांनी 'रयत' हे नाव दिले आहे. कर्मवीरांनी आपल्या संस्थेचे बोधचिन्ह म्हणून वडाचे झाड निवडले. वटवृक्ष हा एका छोट्या पारंबी पासून प्रचंड मोठ्या

प्रमाणामध्ये विस्तारत जातो त्या पद्धतीनेच आपली ही संस्था वटवृक्षाप्रमाणे विस्तारित जावी अशी अण्णांची धारणा होती. पुढे त्यांचे पट्टशिष्य बॅरिस्टर पी. जी. पाटील यांनी अण्णांच्या जीवनावर विस्तृत असे चरित्र लिहिलेले आहे त्याचे नाव 'बाऊनटिफुल बनियन' असे दिले आहे. कर्मवीरांचे स्वीय सहाय्यक श्री मा.भी. काटकर म्हणतात, 'भाऊराव हे आपल्या भाषण वारंवार म्हणू लागले की आमची संस्था म्हणजे वटवृक्षा सारखी आहे. या झाडाची फांदी कोणीही घ्यावी व आपल्या गावी नेऊन लावावी. म्हणजे संस्थेची शाळा सुरू करावी, तेथे ती रुजलीच पाहिजे. म्हणून भाऊरावांनी संस्थेचे बोधचिन्ह वटवृक्ष ठरवले आणि खरोखर पुढे या संस्थेचा पसारा एक सारखा वाढतच गेला' (काटकर मा.भी.,1989 :72).थोडक्यात कर्मवीरांनी रयत आणि वटवृक्ष ही प्रतीके बहुजन समाजाच्या शिक्षणाची चळवळ मोठ्या प्रमाणामध्ये वाढली जावीत यासाठी घेतलेली होती आणि आणि खरोखरच रयतेच्या या अण्णांनी लावलेल्या पारंबीचा आता प्रचंड मोठा वृक्ष वटवृक्ष निर्माण झालेला आहे

**रयत शिक्षण संस्थेची उद्दिष्टे :**

1. मागासलेल्या वर्गात शिक्षणाची अभिरुची उत्पन्न करणे.
2. मागासलेल्या जातीतील अत्यंत गरीब विद्यार्थ्यास शक्य तर मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.
3. सामान्य स्थितीतील विद्यार्थ्यास त्याच्या खर्चाने किंवा फार तर निम्मा खर्च आणि संस्थेत शिक्षण घेण्याकरता ठेवणे.
4. ज्यांची सांपत्तिक स्थिती समाधानकारक आहे अशा परगावच्या मागासलेल्या विद्यार्थ्यांची संस्थेत सोय करणे.
5. मागासलेल्या वर्गातील नीरज जातीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रेमभाव उत्पन्न करणे.
6. पूर्वकालीन अंधरूढींना फाटा देऊन खऱ्या मार्गाचा अवलंब करण्याचे वळण देणे.
7. मिळून मिसळून वागणे आप'पासून संघशक्ती निर्माण होते हे तिचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीने पटविणे.
8. मुले काटकसरी नियमित स्वावलंबी उद्योगी उत्साही व शीलवान बनविण्याचा प्रयत्न करणे.
9. संस्थेच्या शिक्षणाच्या बाबतीत कार्यक्षेत्र वाढवणे. (काटकर मा.भी 1989: 28- 29)

कर्मवीर आण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कृतीशील वैचारिक शैक्षणिक चळवळ उभी केली.याची खालीप्रमाणे वैशिष्टे आहेत.

**1) सत्यशोधकी विचारांचा वारसा :**

मुळातच रयत शिक्षण संस्था ही अण्णांच्या वरती झालेल्या सत्यशोधकी विचारांच्या प्रभावातून निर्माण झालेली आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, 'सत्यशोधक चळवळने सातारा जिल्ह्यातील जमीन नांगरली. ही नांगरट करून तिच्यामध्ये भाऊरावांनी पीकही पेरले. केवळ नांगरट केली नाही (चव्हाण रमेश,संपा., 2016: 7). कर्मवीरानी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारावर बहुजनांना पुरोगामी पद्धतीचे शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला.

**2) विठ्ठल रामजी शिंदे यांचा पाठिंबा आणि वारसा:**

विठ्ठल रामजी शिंदे आणि कर्मवीरांना यांचे संबंध हे गुरुशिष्य प्रमाणे राहिलेले आहेत. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या सुरुवातीच्या लाईफ मेंबरना विठ्ठल रामजी शिंदे यांच्या उपस्थितीत शपथ दिली .यामागे कर्मवीरांचा हा हेतू होता की विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रमाणे या रयत लाईफ मेंबरनी निष्काम पणे रयत शिक्षण संस्थेचे काम केले पाहिजे. वास्तविक पाहता महर्षी शिंदे हे अत्यंत कडक व करारी स्वभावाचे होते. त्यांचे अनेक जणांशी मतभेद झाले होते. परंतु कर्मवीरांच्या बरोबर मात्र असे प्रसंग आले नाहीत. 'महर्षी शिंदे यांनी भाऊरावांना सर्वथैव पाठिंबा दिला. पूर्वी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची एक शाखा साताऱ्यात काढली होती. हे कार्य चालवणारे भाऊराव माझेच वारसदार आहेत असे शिंदे म्हणत. शिंद्यांना गुरुवर्य म्हणून शिरसावंद्य मानून भाऊरावांनी वारसा पत्करला. संपदेत भरच घातली. फरक एवढाच होता की महर्षी शिंदे यांच्या कार्याचे माध्यम व साधन सोशिओ स्पिरीच्युअल होते.भाऊराव यांचे धोरण सामाजिक- इहवादी होते. दोघांनाही सांप्रदायिकता, जातीयता, पक्षीयता अमान्य होती. म्हणूनच रयत शिक्षण संस्थेच्या आजीव सेवकांचा शपथविधी महर्षी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाऊरावांनी घडवून आणला .तात्विक अर्थाने याला फार महत्त्व आहे (2016 :70- 71).

**3 अस्पृश्यता निवारण आणि वसतीगृहांमधील शिक्षण--कर्मवीरांची धर्मनिरपेक्षता:**

सत्यशोधक चळवळीमधील महत्वाचे तत्व म्हणजे अस्पृश्यतानिवारण करणे होय. या तत्त्वानुसार कर्मवीरांनी सुद्धा अस्पृश्यता निवारण होण्याच्या दृष्टिकोनातून सर्वजाती व सर्वधर्मियांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. किंबहुना असे म्हंटले जाते की, रयत शिक्षण संस्थेची स्थापना मुळातच वसतीगृहांमधून झालेली आहे. वसतीगृहाची प्रेरणा अण्णांनी राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून घेतलेली होती. कर्मवीरांनी सातारा येथे छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने शाहू बोर्डिंग ची स्थापना करून आपल्या कामाची सुरुवात केली. यामध्ये सर्व

जाती-धर्माची मुले अण्णांनी ठेवली होती. या वसती गृहाला 1927 मध्ये महात्मा गांधींनी भेट दिली व मी साबरमती मध्ये जे करू शकलो नाही ते तुम्ही या ठिकाणी करून दाखवले आहे असे अण्णांच्या बद्दल गौरवाचे उद्गार काढले. पुढे 1928 मध्ये शाहू बोर्डिंग ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा भेट देऊन पंचवीस रुपयांची देणगी दिली. डॉक्टर आंबेडकर यांनी वसतीगृहाच्या शेरे बुकमध्ये पुढील प्रमाणे शेरा दिला. 'ही एक अशी एकमेव संस्था आहे की राष्ट्र कल्याणाची काळजी वाहणाऱ्या प्रत्येक माणसाने तिच्या उत्कर्षासाठी हातभार लावला पाहिजे (काटकर मा.भी., 1989:50).

वास्तविक पाहता अण्णांची की वस्तीगृहाची योजना म्हणजे अस्पृश्यता निवारणाची प्रयोगशाळाच होती.कोणत्याही बाबतीत अस्पृश्यता पाळायची नाही अशी शिकवण अण्णा देत होते. अण्णांच्या वस्तीगृहाच्या कार्यांमध्ये त्यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाईंनी अत्यंत मोलाचे योगदान दिलेले आहे. याबाबतचा एक प्रसंग येथे सांगणे महत्वाचे आहे. 'एकदा विद्यार्थ्यांना जेवणासाठी धान्य नव्हते. त्याचबरोबर धान्य आणण्यासाठी पैसे नव्हते. कर्मवीर वस्तीगृहाच्या कामाकरता फिरतीवरती होते. कोणीही धान्ये उधार देत नव्हते. अशा प्रसंगी लक्ष्मीबाईंनी स्त्रियांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असणारा दागिना म्हणजे मंगळसूत्र गहाण टाकले आणि त्या पैशातून धान्य आणून विद्यार्थ्यांना जेवण घातले हा प्रसंग त्यांच्या या योगदानाची माहिती सांगणार आहे

कर्मवीरांची महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही श्रद्धा होती. 1932 मध्ये जातीय निवाडा व त्यातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघावरून महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद झाले. यामध्ये महात्मा गांधींनी पुणे येथे येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. शेवटी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा गांधींचे प्राण वाचवण्यासाठी 1932 मध्ये 'पुणे करार' केला व महात्मा गांधीनी उपोषण सोडले. अण्णांच्या दृष्टीने दोन नेत्यांच्या संघर्षाचा गोड शेवट झाला. त्यांच्यामध्ये एकत्व निर्माण झाले या ऐतिहासिक घटनेचे स्मरण जनतेत सतत राहावे व महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिलजमाई चे प्रतीक म्हणून या वसतिगृहास 'युनियन बोर्डिंग हाऊस' असे नाव दिले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनीसुद्धा अण्णांच्या शाहू बोर्डिंगला 1933 मध्ये भेट दिली. त्यावेळेस महाराज म्हणाले, 'भाऊरावांचे कार्य आपल्या देशाला मार्गदर्शक आहे. राजा महाराजांना देखील करता येणार नाही असे मानवतावादी कार्य भाऊरावांनी चालविलेले आहे. सर्वांनी बंधुभावाने वागावे व शिक्षण घेऊन आपला व देशाचा उत्कर्ष साधावा. ही कार्याची मूळ प्रेरणा आहे (काटकर, मा.भी.,१९८९: 66- 67). सरदार वल्लभभाई पटेल यांनीसुद्धा 6 जून, 1940 रोजी शाहू बोर्डिंग बोर्डिंग ला भेट दिली होती त्यावेळेस ते म्हणतात 'आम्ही राजकारणी लोक या देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या प्रकारची लोकशाही यावी असे म्हणतो. त्याचे एक लहानसे रोपटे येथे रुजत आहे हे पाहून आनंद होतो. या कार्यास मी सुयश चिंतितो (1989: 86). जयप्रकाश नारायण यांनी सुद्धा 1941 आणि 1946 अशा दोन वेळेस संस्थेला भेट दिली. व कर्मवीरांची काम हे समाजवादी विचारांच्या तत्त्वप्रणाली नुसार चालू आहे असे गौरवोद्गार काढले. थोडक्यात, भाऊरावांच्या या जाती निरपेक्ष धर्मनिरपेक्ष वस्तीग्रह चा प्रयोग हा खऱ्या अर्थाने आधुनिक काळातील धर्मनिरपेक्षता होईल. अण्णांनी संपूर्ण शिक्षणामध्ये धर्मनिरपेक्षतेला महत्व दिले. रा.ना.चव्हाण म्हणतात, 'जाती धर्मनिरपेक्षता म्हणजे भाऊरावांचा प्रॅक्टिकल सेक्युलॅरिझम होता तो शाहू बोर्डिंग युनियन बोर्डिंग या योजनांमार्फत दृश्य होत होता. भाऊरावांच्या भारतीय सेक्युलॅरिझम मध्ये अस्पृश्यता निवारणाला वरिष्ठ स्थान होते. लोकांना जे अप्रिय होते ते त्यांना प्रिय व्हावे असा भाऊराव प्रयत्न करीत होते. अद्वितीयता येथे होती. भाऊरावांचा सेक्युलॅरिझम सामाजिक ऐक्याचा एकात्म मार्ग होता. यासाठी ब्राह्मण व दलित यांना वगळण्यात आले नव्हते. जातीभेद मोडणे हे ध्येय धोरण होते. त्यांच्या सामाजिक सेक्युलॅरिझम चा अर्थ आजही जाणून घेतला पाहिजे. तरच राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ अर्थ समजू शकेल (2016: 150-151).

**4) श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबी शिक्षण:**

अण्णांनी श्रमप्रतिष्ठेला प्रचंड प्रमाणात महत्त्व दिले आहे. कोणत्याही विद्यार्थ्याने शिक्षण घेत असताना स्वतः कष्ट केले पाहिजेत, श्रम केले पाहिजेत व त्याच्यामधून मिळालेल्या पैशावर शिक्षण घेतले पाहिजे अशी अण्णांची धारणा होती. महात्मा गांधीनी सुद्धा नई तालीम मध्ये श्रम प्रतिष्ठेला महत्त्वाचे स्थान दिले होते. अण्णांनी श्रमप्रतिष्ठा आणि स्वावलंबन यांना केवळ शिक्षणाच्या नव्हे तर जीवनाचा पायाभूत आधार मानले आहे. रयत शिक्षण संस्थेचे 'स्वावलंबी शिक्षण' हे ब्रीद वाक्य आहे. वसतीगृहामध्ये स्वावलंबनाचा आधारावर शिक्षण सुरू केले होते. तशाच प्रकारे महाविद्यालयाची स्थापना करून स्वावलंबी शिक्षण देण्याची योजना आखली. यादृष्टीने त्यांनी सातारा येथे छत्रपती शिवाजी फ्री अँड रेसिडेन्शियल कॉलेज ची 1948 मध्ये स्थापना केली. जो विद्यार्थी ठराविक तास श्रम करेल त्याला या ठिकाणी प्रवेश देण्यात येऊ लागले. विद्यार्थी सर्व प्रकारची शेतीची कामे, इमारत बांधकामाची, मजुरीची खडी फोडण्याची, जनावरांची निगा राखण्याची, भाजीपाला व दूध विक्रीची कामे करत होते. अण्णा त्यांना स्वतः मार्गदर्शन करत होते या श्रमाच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जात होते. कष्टामुळे विद्यार्थ्यांची प्रकृती सुद्धा निकोप राहत होती आणि आणि हे विद्यार्थी

नियमित अभ्यास करत असल्यामुळे परीक्षेमध्ये चांगले गुण सुद्धा मिळवत होते.काही शिक्षण तज्ञ अण्णांना सल्ला देत असत की, यामधून हुशार मुले निवडा आणि त्यांना कष्टाचे काम देऊ नका त्याला खास शिकवण्या लावा परंतु कर्मवीरांना हा सल्ला मान्य नव्हता. अण्णा म्हणतात असे झाले तर श्रम करणारे व श्रम न करणारे यांचे गट पडतील. श्रम न करणारे उच्चवर्णीय प्रमाणे वागतील व श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी लेखतील म्हणून मला हे तत्व मान्य नाही प्रत्येकाने श्रम केलेच पाहिजेत (1989: 94). कर्मवीरांच्या या श्रमप्रतिष्ठा योजनेला म्हणजेच 'कमवा व शिका' योजनेला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. तसेच या योजनेची प्रसिद्धी सुद्धा सर्वदूर झाली. स्वावलंबी शिक्षण हेच विद्यार्थ्याला परिपूर्ण बनवू शकते याची खात्री आण्णांना होती. त्यानुसार या संस्थेमधून शिकून अनेक विद्यार्थी उच्च पदावर गेलेले आहेत. अमेरिकेचे प्रसिद्ध शिक्षणतज्ञ मिस्टर कोप यांनी रयत शिक्षण संस्थेला 6 फेब्रुवारी 1952 ला भेट दिली. त्यावेळेस त्यांनी अण्णांच्या कार्याचा व स्वावलंबी शिक्षणाचा गौरव केला. कोप म्हणतात, 'मी अनेक पुढारी सार्वजनिक कार्याच्या गप्पा मारताना पाहिले आहे पुष्कळ आणि ग्रंथ लिहिले आहेत. परंतु याठिकाणी स्वावलंबनाने जीवनाचा ग्रंथ लिहिला जात आहे हे विशेष होय. इतर कोणत्याही ग्रंथापेक्षा या ग्रंथाची योग्यता अधिक आहे. या वेळी मला असा एक विचार सुचतो की, युनो आणि युनेस्को वगैरे जागतिक संस्था व इतर संस्था आणि इतर राष्ट्रांची पुढारी शांतते संबंधी व्याख्याने देतात व आतून लढाईची तयारी करतात. पण याठिकाणी खऱ्या अर्थाने शांततेची तयारी चालू आहे असे माझे प्रामाणिक मत आहे. या शांततेच्या कार्याचे पुढारी तुमचे नेते कर्मवीर भाऊराव पाटील आहेत. याठिकाणी जात-पात गरीब-श्रीमंत किंवा अन्य प्रकारचा भेद न मानता सर्व एकच आहोत असे मानण्यात येते. संघर्षाचे बीज येथून येथूनच काढून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. भाऊरावांच्या अंगी श्रद्धा, आत्मविश्वास, दूरदृष्टी आणि धमक यांचा सुरेख संगम झाला आहे, आणि म्हणूनच ते गुरु शोभतात. या संस्थेच्या कार्यकर्त्यापासून स्वावलंबी तत्व व महात्मा गांधीजींच्या पासून साधी राहणी ही तत्वे मी मायदेशी घेऊन जाणार आहे (काटकर, 1989: 118). आज सुद्धा रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांच्या मध्ये स्वावलंबन शिक्षणाला महत्व देऊन विद्यार्थ्यांना तशी सोय करण्यात आलेली आहे. कर्मवीरांनी स्थापन केलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये आजही कमवा व शिका योजनेमधून अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम संस्थेचे पदाधिकारी व प्राध्यापक करीत आहेत. भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी मे,2020 मध्ये आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली आहे. वास्तविक पाहता याची सुरुवात कर्मवीरांच्या स्वावलंबनाच्या माध्यमातून विसाव्या शतकामध्ये सुरुवात झालेली आहे असे म्हणता येईल.

**5) बहुजन व मागासवर्गीय समाजात शिक्षणप्रसारातून नेतृत्व उभारणी:**

कर्मवीरांनी खेडे हा हा महत्त्वाचा घटक मानला व या खेड्यांच्या मध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे यासाठी प्रचंड कष्ट घेतले. आज संस्थेचा प्रचंड विस्तार झालेला आहे. 2019 हे शताब्दी वर्ष संस्थेने साजरे केले आहे. महाराष्ट्रामधील 15 जिल्हे व कर्नाटकामधील एका जिल्हा मध्ये 41 वरिष्ठ महाविद्यालये, 438 सेकंडरी स्कूल्स व इतर स्कूल्स मिळून675 शाखा आहेत. जवळपास 17 हजार सेवकवर्ग असून साडेचार लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कर्मवीरांनी स्थापन केलेल्या या खेड्यातील शाळांच्या मधून सर्व जाती-धर्माची बहुजन समाजातील, मागासवर्गीय समाजातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पुर्वापार वंचित असलेला अस्पृश्य समाजामध्ये विद्यार्थ्यांना सुद्धा या शिक्षण संस्थांमधून शिक्षण दिले जात आहे. मा.भी काटकर म्हणतात, 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई व औरंगाबाद येथे उच्च शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय सुरू केली. परंतु महाराष्ट्रातील हजारो खेड्यात जो अस्पृश्य समाज अपमानित जीवन कंठीत आला आहे त्यांच्या मुलाबाळांना प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण देण्याचे काम प्रथम कर्मवीर भाऊरावानीच केले. यामधून शिकून तयार झालेली हरिजनांची पिढी बाबासाहेबांच्या चळवळीत सामील झाली आणि बाबासाहेबांचे हात बळकट झाले. हे भाऊरावांचे ऋण हरिजन समाजाला कधीही विसरता येणार नाही'(1989: 203).

कर्मवीरांच्या शिक्षण संस्थेमुळे खेड्या पाड्यामध्ये शिकलेल्यांची पिढी निर्माण झाली व त्यातून बहुजन समाजामध्ये नेतृत्वाची निर्मिती झाली.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात,'कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ग्रामीण शिक्षण प्रसारामुळे महाराष्ट्रातील समाजकारण,अर्थकारण व राजकारणात नव्या बहुजन समाजाच्या नेतृत्वाचा उदय झाला हे कुणालाही मान्य करावे लागेल.महाराष्ट्रात जे अलीकडे सत्तास्थानात जातात मग ती सत्तास्थाने सहकारी बँका,सहकारी साखर कारखाने, शासकीय कार्यालये,जिल्हा परिषदा,ग्रामपंचायती आणि पंचायत समित्या इत्यादी कोणतीही असोत त्यात त्या ग्रामीण भागातून पुढे आलेल्या पुढाऱ्याबद्दल सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्याचे कारण भाऊराव पाटलांच्या संस्थामधून मिळालेल्या बौद्धिक शिक्षणाने सत्ताधाऱ्यांचे विचार बदलले आहेत (चव्हाण,रमेश (संपा.), 2016 :251-252).

**6) स्त्रीशिक्षणाला महत्व**:

महात्मा फुल्यांनी स्त्रीशिक्षणाला सुरुवात केली.आण्णांनी सुद्धा स्त्रियांच्या शिक्षणासाठी संस्थेमार्फत सोय केली.ग्रामीण भागात मुलांच्याबरोबर मुलीनीसुद्धा शाळेत प्रवेश घेतला पाहिजे यावर भर दिला.सातारा येथे स्त्री शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी १९४२ मध्ये जिजामाता अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली.

**7) शिक्षणव्यवस्थेचे निर्ब्राह्मणीकरण**:

कर्मवीर अण्णांनी शिक्षण प्रसारामध्ये महत्त्वाचे जे काम केले ते म्हणजे ब्राह्मण वर्गाच्या हातामध्ये असणारी शिक्षण व्यवस्था बहुजन समाजाच्या हातामध्ये आणली. शिक्षणामधील ब्राह्मणांचे वर्चस्व संपुष्टात आणले. शिक्षण हे केवळ ब्राह्मण किंवा उच्चभ्रू लोकांची मक्तेदारी नाही ही गोष्ट प्रत्यक्षात उतरवली. अण्णा ब्राह्मणाचा द्वेष करत नव्हते ते ब्राह्मण्याचा विरोध करीत होते. आज केवळ रयत शिक्षण संस्थेमुळे मोठ्या प्रमाणामध्ये बहुजन व मागासवर्गीय समाज शिक्षित झालेला आहे.

**समारोप:**

एकूणच आज महाराष्ट्रामध्ये कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमांमधून मोठ्या प्रमाणात बहुजनांची शैक्षणिक चळवळ उभी राहिली.बहुजन समाजामध्ये नेतृत्वाची निर्मिती झाली. रूढार्थाने शिक्षण तज्ञ नसले तरी खऱ्या अर्थाने कर्मवीर हेच दृष्टे शिक्षण तज्ञ आहेत. ग्रामीण भागातील बहुजनांच्या शिक्षणासाठी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि स्वाध्याय या चतुसुत्रीवर आधारित कर्मवीरांनी व्यापक अशी शैक्षणिक चळवळ उभी केली आणि परिघावरील माणूस समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम केले आहे. आज शतक पूर्ण केलेली रयत शिक्षण संस्था पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण आणि आधुनिक संशोधनामध्ये अत्यंत यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

**संदर्भ :**


- Mathew Anjilvel V.,(1979),Karmaveer Bhauro Patil –An Amazing Story of Organization & Leadership in Rural Education, Rayat Shikshan Sanstha, Satara.
- Babar, Ashok. (2004), Deshivad. Aurangabad: Saket Prakashan,
- पाटील पी.जी.,(2009),कर्मवीरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी,3 री आवृत्ती,प्राचार्य बारीस्टर पी.जी.पाटील प्रतिष्ठान ,सातारा
- काटकर मा.भी.(1989), प्रबोधनाची धगधगती मशाल-- कर्मवीर भाऊराव पाटील,कर्मवीर विद्या प्रबोधिनी,रयत शिक्षण संस्था,सातारा.
- चव्हाण रा.ना.,चव्हाण रमेश (संपा.),(2016),कर्मवीर भाऊराव पाटील एक दर्शन, रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान,पुणे
- पाटील अजित ,(2006),कार्मावीरायण –पदमभूषण कर्मवीर भाऊराव पाटील,डायमंड ,पुणे


**Unpublished Ph.D.Thesis :**


- “The Select Biographies of Karmaveer Bhaurao Patil :A Nativistic Study” Submitted by Thorat Sanjay,Department of English,Shivaji University,Kolhapur,2017.


**लेख:**


- थोरात संजय, ‘द्रष्टा शिक्षण तज्ञ’, महाराष्ट्र टाईम्स,22/09/2018.


**Websites:**


- **www.erayat.org**
- **www.rayatshikshan.edu**